2 6 JUN 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चांदी संशोधनाबाबत शिवाजी विद्यापीठाशी करार

हुपरी : प्रतिनिधी

चांदी उद्योगात संशोधन व विकास कार्यक्रम राबवण्यासंबंधी तीन वर्षीय सामंजस्य करार शिवाजी विद्यापीठ व हुपरी चांदी हस्तकला उद्योग विकास फाऊंडेशन यांच्यात करण्यात आला. अत्याधुनिक तंत्रज्ञान व आकर्षक डिझाईन उपलब्ध करून हुपरीतील चांदी व्यवसायाला ऊर्जितावस्था प्राप्त व्हावी यासाठी हा करार केला आहे.

हुपरी परिसरातील दहा-बारा गावांतील चांदी उद्योजकांबरोबर ३५ हजार कारागिरांना याचा लाभ मिळणार आहे. यावेळी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, उपनिबंधक डॉ. व्ही. एन. शिंदे, सायन्स अँड टेक्नॉलॉजी आणि डीओटीचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. आर. के. कामत, विद्यापीठ इंडस्ट्री इंटरॲक्शन सेलचे संचालक प्रा. डॉ. एस. डी. डेलेकर, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे समन्वयक प्रा. डॉ. ए. बी. कोळेकर, माहिती तंत्रज्ञान विभाग समन्वयक एस. बी. काळे,



कोल्हापूर : सामंजस्य करारप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, फाऊंडेशनचे मोहन खोत, जितेंद्र देशमुख आदी मान्यवर.

सांख्यिकी विभागाचे प्रा. गांजवे, सहायक प्राध्यापक हर्षवर्धन पंडित, तसेच हुपरी चांदी फाऊंडेशनचे मोहन खोत, जितेंद्र देशमुख, चेतन देशपांडे, संदीप अडसुळे, विलास जाधव, शामराव शिंदे, निरंजन रणदिवे आदी मान्यवर उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती लोकोत्सव समितीतर्फे आयोजित व्याख्यानात बोलताना कुलगुरू डॉ. डी . टी शिर्के. व्यासपीठावर सूर्यकांत चव्हाण, मधुरिमाराजे छत्रपती, चंद्रकांत यादव, रमेश मोरे, भाऊ घोडके आदी.

# राजर्षी शाहूंना पाहण्यासाठी त्यांच्या वास्तूंना भेट द्या

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आवाहन

कोल्हापूर ता. २४ : लोकराजा छत्रपती शाहू महाराजांचे खरे रूप पाहायचे असेल, तर शाहू महाराजांनी उभारलेल्या सीपीआर हॉस्पिटल, शाहू मैदान, वैदिक स्कूल किंवा विविध धर्मांच्या वसतिगृहांना विद्यार्थ्यांनी भेट दिली, तर शाहू महाराजांच्या कृतिशील आणि पुरोगामी विज्ञानवादी दृष्टीचे दर्शन होईल; पण त्यासाठी विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या अतिरिक्त वापरातून बाहेर पडावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

छत्रपती शाहू महाराज जयंती लोकोत्सव समितीतर्फे गेली दहा दिवस जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी शाहू प्रबोधनाचा जागर करून शाहू जयंती साजरी केली जात आहे. आज न्यू एज्युकेशन सोसायटीच्या राम गणेश गडकरी सभागृहात कुलगुरूंचे व्याख्यान झाले. या व्याख्यानासाठी विद्यार्थी आणि पालकांनी हजेरी लावली होती.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी छत्रपती शाहू महाराज आत्मसात करायचे असतील तर किंवा त्यांचा विचार अंगीकृत घ्यायचा असेल शंभर वर्षापूर्वी महाराजांनी केलेल्या जनतेच्या विकासासाठी नियोजनात्मक अंमलबजावणी करून शिक्षण क्रीडा व्यापार दळणवळण या सर्वच गोष्टींचा त्यांनी संस्थानात कशाप्रकारे वापर करून घेतला, हे सांगितले आणि समाज सुख-समृद्धी राहण्यासाठी राजांनी नियोजनबद्ध काम केले असे कुलगुरूंनी सांगितले.

अध्यक्षस्थानी मधुरिमाराजे छत्रपती होत्या. उच्च तंत्रज्ञान लेखा शिक्षणाधिकारी रणजीत सपाटे, प्राचार्य सूर्यकांत चव्हाण उपस्थित.होते. सचिन शिंदे, उपमुख्याध्यापक उपाध्ये यांनी आयोजन केले. चंद्रकांत यादव, रमेश मोरे, भाऊ घोडके, लहुजी शिंदे उपस्थित होते.

2 5 JUN 2022
जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फिनशिंग स्कूल लॅबचे कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन



गोकुळ शिरगाव : 'फिनशिंग स्कुल लॅब'' चे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिंदे प्र कुलगुरू प्रमोद पाटील व इतर.

**गोकुळ शिरगाव वार्ताहर**

कोल्हापूर फौंड्री अॅन्ड इंजि. क्लस्टर च्या अंतर्गत गोशिमा सब-क्लस्टर तर्फे सेंटर ऑफ एक्सलन्स मधील फिनिशींग स्कूल लॅबचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना कुलगुरू म्हणाले की, या सेंटर मध्ये उद्योजकांना आवश्यक असणारे रेडी इंजिनीअर्स तयार करण्याचे उत्कृष्ट काम केले जात आहे. तसेच इंजिनिअरींग कॉलेज मधील अभियांत्रिकी शाखेच्या अंतिम वर्ष विदयार्थ्यांसाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त असल्याचे सांगितले. येथील अद्ययावत लॅब बघून पुन्हा प्रशिक्षण घ्यावसे वाटणे हेच या सेंटर ऑफ एक्सलन्स चे यश आहे.

यानंतर बोलताना उद्योजक सचिन शिरगांवकर यांनी ''सेंटर ऑफ एक्सलन्स च्या माध्यमातून इंडस्ट्री व इंजिनिअरींग कॉलेज यामधील दुवा म्हणून काम करताना परीपुर्ण इंजिनिअर तयार करण्यासाठी ख्रिस्तीयानी शार्पलाईन या जर्मन तंत्रज्ञानावर आधारीत प्रशिक्षण देणा-या कंपनीच्या माध्यमातून सदर प्रशिक्षण देण्यात येणार असलेची माहिती यावेळी दिली. या प्रसंगी कोल्हापूर फौंड्री अॅन्ड इंजि.क्लस्टर चे कार्यकारी संचालक श्रीकांत दुधाणे, गोशिमाचे अध्यक्ष मोहन पंडितराव, उपाध्यक्ष दिपक चोरगे, मानद सचिव नितीनचंद्र दळवाई, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष संजय शेटे, उपाध्यक्ष शिवाजीराव पवार, मॅकचे अध्यक्ष संजय पेंडसे, स्मॅक चे अध्यक्ष दिपक पाटील, उपाध्यक्ष एम.वाय.पाटील, संचालक राजू पाटील, हर्षद दलाल, उपाध्यक्ष दिनेश बुधले, प्र.कुलगुरू प्रमोद पाटील, इंडस्ट्रीज इंटरॅक्शन सेलचे सागर डेळेकर, डॉ.ए.एम.गुरव, विश्वकर्मा इन्स्टिटयुटच्या प्राचार्या सौ.डॉ.सुनिता दळवाई, ख्रिस्तीयानी शार्पलाईनचे मोहन अय्यर उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक योगेश कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन रणजित मोरे यांनी केले.

2 5 JUN 2022 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा स्थगित

## नवे वेळापत्रक जाहीर होणार : महाविद्यालयांतील परीक्षा सुरू राहणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाकडून उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षांचा आज, शनिवारपासून प्रारंभ होणार होता. मात्र, सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू स्वरूपात घेण्याच्या मागणीसाठी विद्यार्थी आग्रही आहेत. त्यांनी या मागणीसाठी शुक्रवारी आंदोलन केले. त्यावर विद्यापीठाने काही अपरिहार्य कारणास्तव सर्व परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केला. महाविद्यालय स्तरावर सुरू असलेल्या परीक्षा सुरू राहणार आहेत.

विद्यापीठाने उन्हाळी सत्रातील सर्व परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू स्वरूपात घेण्यासाठी गेल्या दोन महिन्यांपासून विद्यार्थ्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून लढा दिला. गेल्या आठवड्यापासून त्यांनी लढ्याची (पान ८ वर)

### स्थगितीमध्ये लेखी परीक्षांचा समावेश

काही अपरिहार्य कारणास्तव आज, शनिवारपासून प्रारंभ होणाऱ्या विद्यापीठ स्तरावरील सर्व अभ्यासक्रमाच्या लेखी परीक्षा स्थगित करण्यात येत आहेत; परंतु महाविद्यालय स्तरावर सुरू असलेल्या पदवी प्रथम वर्ष पारंपरिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाविद्यालयाच्या नियोजनानुसार सुरू राहतील. विद्यापीठ स्तरावरील परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर यथावकाश जाहीर करण्यात येईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा स्थगित

(पान १ वरून)

तीव्रता वाढविली. त्यावर विद्यापीठाने गुरुवारी सायंकाळी अभियांत्रिकी, विधि अभ्यासक्रमांची परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू, तर उर्वरित सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा पूर्वीप्रमाणे ऑफलाईन वर्णनात्मक घेण्याचा निर्णय जाहीर केला. मात्र, विद्यार्थी संघटना सर्व परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू स्वरूपात घेण्याच्या मागणीवर ठाम राहिल्या. सर्व विद्यार्थी संघटना कृती समितीच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी शुक्रवारी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारात ठिय्या आंदोलन केले. विद्यार्थ्यांची मागणी सोमवारी अथवा मंगळवारी विद्या परिषद या अधिकार मंडळासमोर विद्यापीठ प्रशासनाकडून ठेवण्यात येणार आहे. त्यातील निर्णयानंतर परीक्षेचे स्वरूप आणि सुधारित वेळापत्रक जाहीर होणार आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ स्तरावरील सर्व लेखी परीक्षा स्थगित

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शनिवार, २५ जूनपासून सुरू होणाऱ्या विद्यापीठाच्या स्तरावरील सर्व अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे. मार्च-एप्रिल २०२१-२२ या शैक्षणिक सत्रातील या परीक्षा आहेत.

विद्यापीठाच्या परीक्षा ऑफलाईन घेण्याचा निर्णय झाला. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा ऑफलाईन वर्णनात्मक पद्धतीने घेण्याचे जाहीर केले. मात्र काही विद्यापीठांनी ऑनलाईन, ऑफलाईन वर्णनात्मक, वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पद्धतीने पान २ वर

# शिवाजी विद्यापीठ स्तरावरील सर्व लेखी परीक्षा स्थगित

(पान १ वरून) परीक्षांबाबत धोरण जाहीर केल्याने विद्यार्थी संघटनांनी आंदोलने केली.

परीक्षा विभागाने विधी व अभियांत्रिकीच्या परीक्षा एमसीक्यू पद्धतीने घेण्याचे परिपत्रक प्रसिद्ध करताच शुक्रवारी विद्यापीठासमोर विद्यार्थ्यांनी तीव्र आंदोलन केले.

दुपारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याशी विद्यार्थी संघटना कृती समितीची चर्चा झाली. तेव्हा विद्यार्थी हिताचा निर्णय घेऊ, असे आश्वासन त्यांनी दिले.

त्यानंतर परीक्षा विभागाने परिपत्रक प्रसिद्ध करून काही अपरिहार्य कारणास्तव विद्यापीठ स्तरावरील परीक्षा स्थगित करण्यात येत असल्याचे जाहीर केले. याचे वेळापत्रक नंतर जाहीर करण्यात येणार आहे. मात्र महाविद्यालय स्तरावरील पदवी प्रथम वर्ष पारंपरिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा महाविद्यालयांच्या नियोजनानुसार सुरूच राहणार आहेत, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी म्हटले आहे.